16

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर शहर  **P.S.(ठाणे):** शहर चौक

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0208  **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**27/05/2025 22:46

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार  **Date From (दिनांक पासून):** 27/05/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5  **Date To ( दिनांक पर्यंत):** 27/05/2025
**Time From (वेळेपासून):** 13:39 वाजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:39 वाजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
Date (दिनांक ): 27/05/2025  **Time (वेळ):** 22:28 वाजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
Entry No. (नोंद क्र.): 036
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/05/2025 22:28 वाजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
ईशान्य, 1.5 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जिल्हाधिकारी कार्यालय ,छसंभाजीनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सुरेश सखाराम सिनगारे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1976

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गारखेडा परिसर, ,ताजि छत्रपती संभाजीनगर,शहर चौक,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गारखेडा परिसर, ,ताजि छत्रपती संभाजीनगर,शहर चौक,छत्रपती सभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9545620559

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दिलीप मधुकराव त्रिभुवन | | | 1. आरसीसी विभाग, ,जिल्हाधिकारी कार्यालय,छत्संभाजीनगर,शहर चौक,छत्रपती सभाजीनगर शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | विनोद गोंडूराव खिरोळकर | | | 1. उप-जिल्हाधिकारी, , आरडीसीविभाग, ,जिल्हाधिकारी कार्यालय,छत्संभाजीनगर ,शहर चौक,छत्रपती सभाजीनगर शहर, |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद
दिनांक 27/05/2025
मी सुरेश सखाराम सिनगारे, वय 49 वर्षे, व्यवसाय-शेती व व्यापार, रा. गारखेडा परिसर, ता.जि. छत्रपती संभाजीनगर, मो.क्र. 9545620559

मी वरील प्रमाणे असून दि.23/05/2025 रोजी मी पो.नि.शांतीलाल चव्हाण ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर यांना संपर्क करुन माझ्याकडे माझ्या कामासाठी लोकसेवक लाचेची मागणी करत असल्या बाबत तक्रार असल्याचे कळवुन त्यांना आमखास मैदान परिसर छ.संभाजीनगर येथे सुरक्षीत ठिकाणी येणे बाबत सांगितले होते. त्यावरुन पो.नि. शांतीलाल चव्हाण, सोबत सापळा पथक व दोन पंच असे सापळा कारवाईकामी लागणारे साहित्यासह आमखास मैदान परिसर, छ.संभाजीनगर येथे सुरक्षीत ठिकाणी 16.00 वा.पोहचले होते. त्या ठिकाणी पो.नि. शांतीलाल चव्हाण यांचेकडे मी दोन पंचासमक्ष तक्रार दिली होती की, मी वर नमुद ठिकाणी राहणार असुन शेती व व्यापार व्यवसाय करतो,

मी माझे पार्टनर भूषण देविदास शिरोळे व सुभाष तान्हाजी साताळकर अशांनी मिळुन मौजे तिसगांव शिवार ता.जि. छत्रपती संभाजीनगर येथे शेषराव रखमाजी काळे यांचे कडून सन 2023 मध्ये त्यांची गट नं. 225/05 ही वर्ग 2 ची जमिन (6 एकर 16 गुंठे) खरेदी केली होती व ती नियमाकुल करण्यासाठी मी शासनाकडन रितसर परवानगी आणलेली होती. व त्या परवानगीचे चलन भरण्यासाठी मी मा.जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना अर्ज केलेला होता. तो अर्ज मंजूर करण्यासाठी मा.निवासी उप-जिल्हाधिकारी यांनी मला 23 लाख रुपयांची मागणी केलेली होती. मी त्याना त्यावेळेस विनती केली की; मी शासनाकडून रितसर परवानगी आणलेली आहे. तरी सुध्दा तुम्ही मला पैशांची मागणी का करता आहे. तेव्हा त्यांनी उत्तर दिले की, तुम्हाला 23 लाख रुपये दिल्याशिवाय तुमची जमिन नियमाकुल होणार नाही. जर तुम्ही याची कुठेही बाहेर वाच्यता केली तर मला हा अधिकार आहे की, ही जमिन मी शासन जमा करु शकतो. हे त्यांचे बोलणे ऐकून मी घाबरुन गेलो कारण मी ती जमिन 3 करोड रुपयांमध्ये खरेदी केलेली होती. आणि मला आत्महत्या केल्याशिवाय काहीही पर्याय उरलेला नव्हता. आणि म्हणून मी त्यांना इच्छा नसतानाही 23 लाख रुपये देण्यासाठी मजबुर झालो. आणि ती रक्कम त्यांनी माझ्या पार्टनर भुषण शिरोळे याचे धरुन स्विकारली.

आता सदरची जमिन वर्ग 2 मधून वर्ग 1 करण्यासाठी त्या जमिनीचा नजराना म्हणून पुन्हा शासनास चलनद्वारे पैसे भरावयाचे आहे. त्यासाठी लागणारे चलन पुन्हा जनरेट करुन देण्यासाठी महसुल सहायक श्री त्रिभूवन व निवासी उप-जिल्हाधिकारी (आरडीसी) श्री खिरोळकर हे मला व माझे पार्टनर शिरोळे यांना लाच म्हणून 18 लाख रुपयांची मागणी करत आहे. मला त्यांना 18 लाख रुपये देण्याची ईच्छा नसल्याने मी त्यांना नाईलास्तव हो म्हणून आलेलो आहे. आज त्यांनी मला व माझे पार्टनर भूषण शिरोळे यांना पुन्हा सदर कामासाठी जिल्हाधिकारी कार्यालय मधील

निवासी उप-जिल्हाधिकारी (आरडीसी) छत्रपती संभाजीनगर यांचे कॅबिन जवळ बोलाविलेले आहे त्यावेळी महसुल सहायक श्री त्रिभूवन व निवासी उप-जिल्हाधिकारी (आरडीसी) श्री. विनोद खिरोळकर हे मला माझी वरील गट नं. 225/05 मधील जमिन वर्ग 2 मधून वर्ग 1 मध्ये करण्यासाठी शासनास भरण्यासाठी लागणारे चलन जनरेट करुन देण्यासाठी 18 लाख रुपयांची मागणी स्वत: किंवा ईतरामार्फत करुन सदरची रक्कम त्यांनी स्वत: किंवा ईतरामार्फतीने स्विकारल्यास त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी ही विनंती आहे.

माझा महसुल,सहायक श्री त्रिभूवन व निवासी उप-जिल्हाधिकारी (आरडीसी) श्री.विनोद खिरोळकर यांचेसोबत पैशाचा देण्या-घेण्याचा किंवा उसणवारीचा काहीएक व्यवहार नाही. अथवा वैर अगर दुष्मणी नाही.

माझी वरिल प्रमाणे तक्रार मी सांगितल्या प्रमाणे लॅपटॉपवर टंकलिखीत केलेली असून ती मी वाचुन पाहिली ती बरोबर व खरी आहे. वैगरे मजकुराची तक्रार दि.23/05/2025 रोजी पो.नि. चव्हाण व पंचाचे समक्ष सुरक्षीत ठिकाणी तक्रार दिली होती. माझी टंकलिखीत तक्रार पंचानी वाचली मी सांगितलेली तोंडी तक्रार व वाचण्यास दिलेली तक्रार एकच असल्याचे पाहुन त्यावर दोन्ही पंचानी व पो.नि.श्री.शांतीलाल चव्हाण व मी अशांनी स्वाक्षरी केल्या आहेत. त्यावेळी मी दोन्ही पंचासमक्ष पो.नी.श्री.चव्हाण यांना कळविले की, संबंधीत लोकसेवक यांचे भेटीसाठी माझे व्यवसाय पार्टनर श्री.भुषण शिरोळे हे देखील माझ्या सोबत येणार असुन ते सध्या जिल्हाधिकारी कार्यालय छ. संभाजीनगर येथे थांबलेले आहेत.

त्यानंतर माझ्या तक्रारीच्या अनुषंगाने पो.नि.शांतीलाल चव्हाण, मी व दोन पंच असे आम्ही सर्वानुमते दि. 23/05/2025 रोजी संबंधीत लोकसेवक यांची जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे जावुन लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर पो.नि.श्री.चव्हाण यांनी पंचाना व मला सोनी कंपनीचा व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्या बाबत सविस्तर माहिती दिली. तसेच लाचमागणी पडताळणी संदर्भात दोन पंच, सापळा पथक व मला सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर डीजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्याकडे दिला तो मी अंगावर परिधान केलेल्या शर्टच्या आतील बाजुस कोणास दिसणार नाही असा ठेवुन दिला. त्यानंतर पंच क्र.1 श्री.अस्लम शेख व मी असे माझे चारचाकी वाहना मध्ये बसुन दि.23/05/2025 रोजी 16.51 वाजता सुरक्षीत ठिकाणावरुन जिल्हाधिकारी कार्यालय, छ.संभाजीनगर कार्यालयाकडे रवाना झालो.

जिल्हाधिकारी कार्यालय छ.संभाजीनगर येथे पोहचलो तेथे माझे पार्टनर श्री.भुषण शिरोळे आम्हाला भेटले त्यांना सोबत घेवुन आम्ही जिल्हाधिकारी कार्यालयातील आर.डी.सी.विभागात गेलो तेथे महसुल सहाय्यक श्री.त्रिभूवन यांची भेट घेतली त्यावेळी महसुल सहाय्यक श्री.त्रिभुवन व आमचेमध्ये कामासंबंधाने चर्चा झाली. सदर चर्चेवेळी पार्टनर श्री.शिरोळे यांनी श्री.त्रिभुवन यांना यापुर्वी तेवीस लाख रुपये पैकी बावीस लाख रुपये दिले व ते महसुल सहाय्यक त्रिभुवन यांनी घेवुन आर.डी.सी. साहेब यांचेकडे दिले बाबत चर्चा झाली. सदर चर्चेनंतर मी श्री.त्रिभुवन यांना आमची एकच फाईल आहे तेवढ साहेबांना बोला व 12 लाखात फायनल करुन टाका असे म्हणालो असता श्री.त्रिभुवन म्हणाले की, (आर.डी.सी.) साहेबांना विचारुन सांगतो शंभर टक्के, साहेब इथपर्यंत तुम्हाला कराव लगत हे कन्वेस करायचा प्रयत्न करतो असे म्हणाले त्यानंतर मी श्री.त्रिभुवन यांना विचारले की, आपण त्या दिवशी काय बोलले त्यावर श्री.त्रिभुवन म्हणाले की, पहिले जेवढे दिले होते त्याच्यात एक कमी करतो अस साहेबांच म्हणन होत. त्यावेळी माझे पार्टनर श्री. शिरोळे म्हणाले की, आठरा लाख रुपये मागत होते. त्यावर श्री.त्रिभुवन म्हणाले की, हा., (18) आठरा म्हणत होते ते इथ किलीअर खट, असे बोलुन 18 लाख रुपये लाचेची मागणी करुन तुम्ही सोमवारी या आपण सोमवारी क्लीयर करु असे म्हणले. त्यानंतर आम्ही सुरक्षीत ठिकाणी 17.46 वाजता परत आलो. व घडलेली हकिगत पो.नि.चव्हाण यांना सांगितली त्यांनी पंच व आमचे समक्ष डीजिटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉड झालेले संभाषण ऐकले त्यामध्ये लाचमागणीच्या वेळी झालेल्या संभाषणात आमचे कामाचा फक्त फाईल असा उल्लेख आला असल्याचे दिसुन आले तसेच लाचमागणी वेळी आर.डी.सी. श्री. खिरोळकर यांची प्रत्यक्षात भेट झाली नसल्याने दोन्ही पंच व पो.नी.श्री.चव्हाण व आम्हा सर्वांचे मते सोमवारी दि.26/05/2025 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे महसुल सहाय्यक श्री.त्रिभुवन व आर.डी.सी.श्री.खिरोळकर यांची लाचमागणी पडताळणी परत एकदा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्यानुसार दि.26/05/2025 रोजी मी कार्यालयीन वेळेत ला.प्र.वि.कार्यालय छ.संभाजीनगर येथे पोहचलो तेथे पो.नी.चव्हाण, दोन्ही पंच व सापळा पथक हजर हाते. त्यावेळी आमचे ठरल्यानुसार परत एकदा लाचमागणी पडताळणी करणे आहे असे सांगुन पंचाना व मला व्हाईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहिती देवुन लावमागणी पडताळणी संदर्भात दोन्ही पंच व मला सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर डीजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्याकडे दिला तो मी अंगावर परिधान केलेल्या शर्टच्या आतील बाजुस कोणास दिसणार नाही असा ठेवुन दिला. पंच क्र.1 श्री.अस्लम शेख व मी असे ला.प्र.वि. कार्यालय येथुन माझे चारचाकी वाहना मध्ये बसुन

दि.26/05/2025 रोजी 12.18 वाजता सुरक्षीत ठिकाणावरुन जिल्हाधिकारी कार्यालय, छ.संभाजीनगर कार्यालयाकडे रवाना झालो
जिल्हाधिकारी कार्यालय छ.संभाजीनगर येथे मी व पंच क्र.1 पोहचलो तेथे जिल्हाधिकारी कार्यालयातील आर.डी.सी.विभागात गेलो व महसुल सहाय्यक श्री.त्रिभुवन यांची भेट घेतली व त्याच्याकडे कामासंबंधाने चर्चा केली. त्यानंतर त्यानी मला आर.डी.सी.श्री.खिरोळकर यांचे कक्षामध्ये नेले त्या ठिकाणी माझी आर.डी.सी. श्री.खिरोळकर व महसुल सहाय्यक श्री.त्रिभुवन यांचेशी माझे काम गट नं.225/5 मधील जमीन वर्ग 2 मधुन वर्ग 1 मध्ये करण्यासंबंधाने चर्चा झाली सदर चर्चेवेळी मी श्री.खिरोळकर यांना म्हणालो की, तुम्ही त्या दिवशी म्हणले होते ना, एक कमी,, त ठिक हाय करुन टाकतो आता त्यावर आर.डी.सी. श्री.खिरोळकर म्हणाले की, करुन घ्या त्यानंतर मी परत श्री. खिरोळकर यांना म्हणालोकी, आज त्यानला संध्याकाळी पाच लाख देवुन टाकतो, उदया महया फाईल करुन दया, बाकीच फायनल पेमेंट करुन टाकतो, आठरा करुन टाकतो असे म्हणालो, त्यावर श्री. खिरोळकर ठिक हे असे म्हणुन 18 लाख रुपये लाचेची मागणी केली. आमचे असे बोलणे झाल्यानंतर मी पंचासह सुरक्षीत ठिकाणी 12.59 वाजता परत आलो. त्याठिकाणी सापळा अधिकारी पो.नि.श्री.शांतीलाल चव्हाण यांनी विचारले वरुन पंच क्र.1 यांनी व मी सर्व हकिगत सांगितली. त्यानंतर पो.नि. चव्हाण यांनी पंच व माझे समक्ष डीजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण [illegible] दि.26/05/2025 रोजी आर.डी.सी.श्री.खिरोळकर यांनी माझ्याकडे 18,00,000/-रु.लाचेची मागणी केली असल्याचे व मागणी केलेल्या रकमेपैकी 5,00,000/-रु. लाच रक्कम श्री.त्रिभुवन महसुल सहाय्यक हे स्विकारणार असल्याचे लाचमागणी पडताळणीत निष्पन्न झाले. त्यानंतर पो.नि.चव्हाण यांनी सापळा कामी संबंधीतास देण्यात येणाऱ्या रक्कमे बाबत माझ्याकडे विचारले असता मी त्याना माझ्याकडे फक्त एक लाख रुपये रोख रक्कम असल्याचे कळविले त्यावरुन दोन्ही पंचासमक्ष एक लाख रुपये भारतीय चलनातील नोटा व उर्वरीत चार लाख रुपये भारतीय बच्चो का बँक (लहान मुलांच्या खेळण्यातील नोटा) सापळा कामी वापरण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. तसेच पो.नि.चव्हाण, दोन्ही पंच व मी असे सर्वानुमते दि. 27/05/2025 रोजी एका सुरक्षीत ठिकाणी येवुन तेथुन जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे लाचेचा सापळा आयोजीत करण्याचे ठरले.
त्यानंतर दि.27/05/2025 रोजी सापळा कारवाईच्या अनुषंगाने मी, दोन्ही पंच व सापळा पथक असे सुरक्षीत ठिकाणी हजर आलो. तेथे पो.नि.चव्हाण यांनी सापळा कारवाईच्या अनुषंगाने मला व दोन्ही पंच तसेच सापळा पथक यांना सुचना देवुन, अल्ट्राव्हाईलेट लॅम्प, ॲन्थ्रोसिन पावडर, व्हाईस रेकॉर्डर या बाबत मार्गदर्शन करुन प्रात्यक्षीक करुन दाखवले. त्यानंतर सापळा कारवाईच्या वेळी महसुल सहाय्यक श्री. त्रिभुवन यांना लाच म्हणुन देण्याकरिता मी हजर केलेली 1,00,000/- रुपये रक्कम ज्यात 500/- रुपये दराच्या भारतीय चलनी 200 नोटा व भारतीय बच्चो का बँक (लहान मुलांच्या खेळण्यातील नोटा) 4,00,000/-रुपये रक्कम ज्यात 500/-रु.आकडे असलेल्या 800 नोटा त्यांना ॲन्थ्रोसिन पावडर लावुन माझ्या जवळ असलेल्या एका लाल रंगाच्या कापडी पिशवी मध्ये ठेवण्यात आल्या. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्याजवळ दिला तो मी परिधान केलेल्या शर्ट मध्ये लपविला. त्यानंतर मी माझे व्यवसाय पार्टनर श्री.भुषण शिरोळे व पंच क्र.1 श्री.अस्लम शेख असे माझे खाजगी चार चाकी वाहनाने सुरक्षीत ठिकाणावरुन 13.25 वा. सोबत रवाना झालो. आमचे पाठोपाठ पो.नि.चव्हाण, सापळा पथक व पंच क्र.2 असे दुसऱ्या वाहनाने आले. त्यानंतर आम्ही जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर समोर असलेल्या रोडचे बाजुस आमचे वाहन उभे केले. त्यावेळी पंच क्र.1 अस्लम शेख हे गाडीचे बाहेर उतरुन गाडी जवळ उभे राहिले. त्यानंतर थोडयावेळाने महसुल सहाय्यक श्री. त्रिभुवन हे आमचे वाहनाजवळ आले व वाहनाचे आत मध्ये येवुन बसले त्यावेळी आम्ही त्यांचेशी आमचे कामा संबंधी चर्चा केली त्यानंतर माझ्याकडे असलेल्या लाल रंगाची पिशवी त्यामधील रोख रक्कमेसह मी उजव्या हाताने त्यांचे समोर धरली व हे मोजुन घ्या बंडल, देवु का हातात असे म्हणालो असता श्री.त्रिभुवन यांनी द्या ना, द्या ना असे म्हणत पंच क्र.1 यांचे समक्ष सदर लाचेची रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्वत: स्विकारुन त्यांचे जवळ घेतली व पिशवी मधील नोटांचे बंडल बाहेर काढुन परत पिशवी मध्ये ठेवले. त्यानंतर मी सापळा पथकास दिसेल अश्या रितीने 13.39 वाजता लाच स्विकारलेचा पुर्वनियोजीत ईशारा केला असता सापळा पथकातील अधिकारी, कर्मचारी व पंच असे घटनास्थळी हजर आले व पो.नि.श्री.शातीलाल चव्हाण यांनी महसुल सहायक श्री.त्रिभुवन यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेतले. त्यानंतर पो.नि.चव्हाण यांनी त्यांना आपला व सापळा पथकाचा परिचय देवुन त्यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव दिलीप मधुकरराव त्रिभुवन वय 43 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-महसुल सहायक, आर.डी.सी.विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय छ.संभाजीनगर, रा.स्वामी समर्थ नगर, वैजापुर ता.वैजापुर जि.छ.संभाजीनगर असे सांगितले त्यानंतर पो.नि.चव्हाण यांनी पुढील ॲन्थ्रासिन पावडर संदर्भातील प्रात्यक्षीक कार्यवाही केली. त्यानंतर आमचे प्रकरणाची फाईल बाबत श्री.त्रिभुवन यांना विचारले असता त्यांनी कार्यालयात

असल्याचे सांगितले त्यावरुन पो.नी.चव्हाण यांनी सापळा पथकातील एक टिम आर.डी.सी.विभागात पाठवली सदर टिमने आर.डी.सी.श्री.विनोद खिरोळकर (निवासी उप जिल्हाधिकारी) यांना ताब्यात घेतले आहे. त्यानंतर दोन्ही पंच, सापळा पथक व मुहसुल सहायक 1) दिलीप मधुकर त्रिभुवन, 2) विनोद खिरोळकर, निवासी उपजिल्हाधिकारी व मी असे तेथुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे आलो. वरिल घटनेबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तरी दि.23/05/2025 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय छ.संभाजीनगर येथील आर.डी.सी.विभाग येथे महसुल सहाय्यक श्री.दिलीप त्रिभुवन यांनी आमचे तिसगाव, छत्रपती संभाजीनगर येथील गट क्र.225/5 मधील 6 एक्कर 16 गुंठे जमीन वर्ग 2 मधुन वर्ग 1 मध्ये करण्यासाठी शासनास नियमानुसार चलन भरणा करणे असल्याने त्यासाठी लागणारे चलन जनरेट करुन देण्यासाठी दि. 23/05/2025 रोजी केलेल्या लाचमागणी पडताळणी मध्ये पंच क.1 याचे समक्ष आलोसे महसुल सहाय्यक त्रिभुवन यांनी 18 लाख रुपये लाचेची मागणी केली व दि.26/05/2025 रोजी केलेल्या लाचमगणी पडताळणीत श्री.विनोद खिरोळकर निवासी उप-जिल्हाधिकारी यांनी माझे सदर कामासाठी त्यांचे कक्षामध्ये 18 लाख रुपये लाचेची मागणी करुन 18 लाख रुपये पैकी प्रथम 5 लाख रुपये व काम झाल्यानंतर उर्वरीत 13 लाख रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. तसेच मागणी केलेली लाचेची रक्कम दि. 27/05/2025 रोजी 13.39 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय छ.संभाजीनगर येथे समोरील हायवे रोडवर माझे खाजगी चारचाकी वाहनामध्ये पंच क्र. 1 यांचे समक्ष स्वत: स्विकारल्या नंतर त्यांना सापळा पथकाने लाच रक्कमेसह ताब्यात घेतले आहे. तरी 1) दिलीप मधुकराव त्रिभुवन, महसुल सहाय्यक, आर.सी.सी.विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय छ.संभाजीनगर व 2) विनोद गोंडूराव खिरोळकर, निवासी उप-जिल्हाधिकारी, आर.डी.सी. विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय छ.संभाजीनगर याचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे. माझी वरिल फिर्याद माझे सांगणे प्रमाणे मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष हि फिर्याद दिली सही

दाखल करणार - पोउपनि श्री निवृत्ती गायके
तपास अधिकारी - पोनि शांतीलाल चव्हाण, ने. ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Nirmala Mansing Pardeshi(I (Inspector)) / POBN74842 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Nirmala Mansing Pa

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): POBN74842

डी.ओ.अधिकारी
पोलीस स्टेशन सिटीचौक
छ.संभाजीनगर